**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दि.१३/०८/२०२६

मा. भारत निवडणूक आयोगाद्वारे महाराष्ट्र राज्यात मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम (Special Intensive Revision) सुरु झालेला असुन दिनांक ३०/०६/२०२६ ते १७/०८/२०२६ या कालावधीमध्ये टप्पेनिहाय पूर्ण करावयाचा आहे. त्या अनुषंगाने दि. १७/०८/२०२६ अखेर मतदान केंद्रस्तरीय अधिका-यामार्फत (BLO) घरोघरी भेटी देऊन मतदान केंद्राचे सुसुत्रीकरण करून व पुनर्रचनेचा टप्पा पुर्ण करावयाचा आहे.

त्या अनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील विविध सहकारी सोसायट्यांमध्ये राहणारे सर्व घरमालक, भाडेकरू,भोगवटदार रहीवासी यांचे नाव व मोबाईल क्रमांक असलेली स्वतंत्र यादी तयार करून दि.१४/०८/२०२६ रोजी सकाळी पुरविण्याचे आदेश मा. जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, पालघर यांचेकडून प्राप्त झाले आहेत.

तरी, वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व सहकारी सोसायट्यांचे अध्यक्ष / सचिव यांनी आपल्या अधिनस्त सहकारी सोसायटी मध्ये राहणा-या सर्व घरमालक, भाडेकरू, भोगवटदार रहीवासी यांचे नाव व मोबाईल क्रमांक असलेल्या स्वतंत्र याद्या आपल्या स्तरावर तातडीने तयार करून अध्यक्ष व सचिव यांच्या स्वाक्षरीसह श्री. कुमार चव्हाण, उप निबंधक, सहकारी संस्था, वसई (भ्रमणध्वनी क्र.९१६७९२७३९९) यांच्या मार्फत सर्व मतदार नोंदणी अधिकारी (ERO) क्रमांक १३१,१३२ व १३३ यांना दि.१४/०८/२०२६ रोजी सकाळी पुरविणेकामी सर्व सहकारी सोसायट्यांचे अध्यक्ष / सचिव यांनी सहकार्य करावे असे आवाहन डॉ. इंदु राणी जाखड, मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी पालघर यांनी केले आहे.